# उत्तरे

# अभ्यास पुस्तिका-७

## १. अभंगवाणी

**प्र. १.** १. वेदांनी विठ्ठलाचा जयघोष केला आहे. २. जेथे जावे तेथे राम आहे असे रामदास म्हणतात. ३. रामाचे दर्शन म्हणजे सुखाचे क्षण होय. ४. भूमंडळात देवाचा वास आहे. ५. देवाचा वास अणुरेणूत आहे. ६. परमात्म्याला वाळवंटात आणून उभे केले आहे. ७. देवांत कधीही फरक होत नाही. ८. देव अक्षय आहे.

**प्र. २.** या प्रश्नाचे उत्तर विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकात पाहून लिहावे.

**प्र. ३.** १. ज्यांनी आपल्या अविनाशी संकल्पांनी हे विश्व निर्माण केले आहे आणि जो अनाथ जीवांचा मायबाप आहे.

२. जेथे जावे तेथे राम माझ्याबरोबर आहे. मग आता मी काळजी का करू.

३. तो (परमेश्वर/देव) अणुरेणूत भरलेला असून त्या एकाचीच अनेक रूपे झालेली आहेत.

४. अहो देवाचा वास खरोखर भूमंडळात आहे. जसा तो दिगंतरात आहे.

५. या परमात्म्याला पुंडलिकाने येथे या वाळवंटात आणून कमरेवर हात ठेवून उभे राहावयास लाविले आहे.

६. परमेश्वर हा भक्तांच्या अगदी सानिध्यात आहे. ह्या विचाराने रामदासांच्या मनाला आनंद वाटत आहे.

## २. स्वामी विवेकानंद

**प्र. १.** १. नरेंद्रने खिडकीबाहेर एक संन्यासी थंडीने कुडकुडत आहे हे पाहिले. २. नरेंद्रला खेळाची आवड होती. ३. मजुराच्या डोक्यावर झोपाळ्याचा लोखंडी खांब पडला. ४. नरेंद्र म्हणजे स्वामी विवेकानंद होय. ५. मजूर शुद्धीवर आल्यामुळे मुलांना हायसे वाटले. ६. नरेंद्रने आपल्या अंगावरील भारी किमतीची शाल दिली.

**प्र. २.** १. नरेंद्रने सर्व मुलांकडून पैसे गोळा करून व आपल्याकडील सर्व पैसे त्यात घालून जमलेली रक्कम मजुराच्या हाती दिली व म्हणाला, "या पैशातून औषधोपचार करा." म्हणून त्या मजुराने कृतज्ञतेने सर्व मुलांकडे पाहिले.

२. नरेंद्रला वाचनाची आवड होती. वडील पुस्तक आणायचे. ती तो मन लावून वाचत असे. आई भुवनेश्वरी त्याला रामायण व महाभारतातील गोष्टी सांगे. अशा गोष्टीतून नरेंद्रावर चांगले संस्कार झाले.

३. झोपाळ्यावर मुले खेळत असताना झोपाळा तुटून खाली पडला. झोपाळा नीट करत असताना वयस्कर कामगार तेथे आला. तो मुलांना मदत करत असताना झोपाळ्याचा लोखंडी खांब मजुराच्या डोक्यावर पडला व मजुराच्या डोक्याला जखम झाली.

**प्र. ३.** १. थंडी २. कुडकुडत ३. भगवान ४. व्यायाम ५. झोपाळा ६. वाचनाची ७. हिवाळ्याचे

**प्र. ८.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर

## ३. थोर शास्त्रज्ञ-लुई पाश्चर

**प्र. १.** १. तापवलेल्या सळईने लोहार चटके देत होता. २. शिक्षण पूर्ण झाल्यावर लुईने रोगजंतूविषयी संशोधन सुरू केले. ३. घाबरून घराकडे धूम ठोकणाऱ्या मुलाचे नाव लुई पाश्चर होते. ४. लुईने अनेक कुत्रे, ससे यांच्यावर प्रयोग केले.

५. रोगाची रोगप्रतिबंधक लस कशी तयार करावी यावर लुईचे लक्ष केंद्रित झाले.

६. 'हायड्रोफोबिया' या रोगाविरुद्धचे इंजेक्शन लुईने जोसेफला दिले.

**प्र. २.** १. लोहाराचे २. जखमेवर ३. लुई ४. प्रयोग ५. प्राण ६. पिसाळलेला ७. मेंदूचाच

**प्र. ३.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर

**प्र. ४.** १. एकदा त्याने सौम्य अशी प्रतिबंधक लस तयार केली व त्याचा पडताळा पाहिला. ज्या कुत्र्याला ती लस दिली त्याला पिसाळलेला कुत्रा चावूनही काही होत नाही हे त्याच्या लक्षात आले. अशा तऱ्हेने लुईने रोग प्रतिबंधक लस शोधली.

२. पिसाळलेल्या कुत्र्यांना व त्यांच्या चावल्यामुळे माणसांना होणाऱ्या रोगास 'रॅबिज' किंवा 'हायड्रोफोबिया' म्हणतात.

३. पिसाळलेला कुत्रा चावल्यावर एकच इलाज आज जगास माहीत आहे आणि तो म्हणजे पाश्चरने तयार केलेली लस. या लसीमुळे आपण आज 'रॅबीज' होऊ नये म्हणून उपाय करू शकतो व आपले प्राण वाचवू शकतो.

## ४. मायेचा प्रभाव

**प्र. १.** १. देवदत्तला आपल्या चुलतभावाने आपल्याला अधिक आपुलकीची आणि जवळीकीची वागणूक द्यावी असे वाटे.

२. वाईट शत्रूला प्रेम आणि ममत्वाच्या भावनेने जिंकता येते.

३. देवदत्त गौतम बुद्धाच्या चुलतभावाचे नाव होते.

४. देवदत्तने गौतम बुद्धांच्या मार्गावर पिसाळलेल्या हत्तीणीला सोडले.

५. देवदत्तांनी हत्तीणीला मद्य पाजले.

६. हत्तीण बुद्धांपासून वीस-पंचवीस पावलांवर होती.

**प्र. २.** १. गौतम बुद्धांचा २. हत्तीण ३. धडा, कट ४. गर्दी

**प्र. ३.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर ५. बरोबर

**प्र. ४.** १. आपल्या चुलतभावाने आपल्याला अधिक आपुलकीची आणि जवळीकीची वागणूक द्यावी असे देवदत्तला वाटत असे. त्यामुळे देवदत्ताच्या मनात राग धुमसत होता. त्यातून त्याने गौतम बुद्धाला धडा शिकवण्याचा कट रचला.

२. गौतम बुद्धांनी हत्तीणीला स्पर्श करण्यासाठी हात उंचावला. त्या अवाढव्य प्राण्याला त्यांच्यातील प्रेम आणि ममत्त्वाची जाणीव झाली; म्हणून हत्तीण त्यांच्यासमोर पुढचे दोन्ही पाय दुमडून बसली.

३. अगदी वाईट शत्रूलादेखील प्रेम आणि ममत्वाच्या भावनेने जिंकता येते आणि त्याच्या मनात शत्रुत्वा ऐवजी आदर निर्माण करता येतो. हे गौतम बुद्धांनी दाखवून दिले.

## ५. गणपतीपुळे एक निसर्गरम्य स्थळ

**प्र. १.** १. देशाटन केल्यामुळे माणसाच्या अंगी शहाणपणा येतो असे कवी मुक्तेश्वर म्हणतात.

२. लहानपणापासून लेखकाला प्रवास करण्याची आवड होती.

३. शिवाजी महाराज यांचे प्रधान अण्णाजी दत्तो यांनी देवळाचा गाभारा बांधला.

४. परशुरामांनी चिपळूणजवळ परशुरामक्षेत्र निर्माण केले.

५. सृष्टीचे विशाल रूप डोंगराला प्रदक्षिणा घालताना दिसते.

६. समुद्र किनाऱ्याला लागूनच सुमारे तीनशे फूट उंचीची टेकडी आहे.

७. टेकडीच्या पायथ्याशी गणपतीचे मंदिर आहे.

८. झाडीतील गावे लहान-लहान चित्रांसारखी दिसतात.

**प्र. २.** १. चूक २. बरोबर ३. चूक ४. बरोबर ५. चूक

**प्र. ३.** १. भगवान परशुरामांनी चिपळूणजवळ परशुरामक्षेत्री उपासनेसाठी गणपतीचे अस्तित्व असावे म्हणून प्रार्थना केली. त्यामुळे हा स्वयंभू गणपती प्रकट झाला. ही गोष्ट कानोकानी पसरली. त्यामुळे या जागेला देवत्व प्राप्त झाले.

२. 'पुळे' हे ठिकाण कोकणातील रत्नागिरी या जिल्ह्यात आहे. तेथील गणपतीच्या देवस्थानामुळे आज ते ठिकाण 'गणपतीपुळे' म्हणून ओळखले जाते.

**प्र. ४.** १. अथांग २. स्वच्छंदपणे ३. चित्रांसारखी ४. पक्ष्यांच्या

## ६. श्रावणमास

**प्र. १.** १. श्रावणात चोहिकडे हिरवळ दाटली आहे.

२. क्षणात पाऊस तर क्षणात ऊन पडते.

३. आकाशात पाहून इंद्रधनूचे गोफ कोणी विणले आहे असे कवीला वाटते.

४. पिवळे पिवळे ऊन पडले आहे.

५. वरती बघता इंद्रधनूचे गोफ विणले आहे असे वाटते.

**प्र. २.** या प्रश्नाचे उत्तर विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकात पाहून लिहावेत.

**प्र. ३.** १. श्रावणात चोहीकडे हिरवळ पाहून मनाला आंनद होतो. क्षणात पाऊस मन भिजवते व क्षणात ऊन पडते.

२. भिजलेले पंख पाखरे फडफड करून सावरतात. हरिणी आपल्या बाळांसह हिरव्या कुरणी चरत आहे व बागडत आहे.

३. खिल्लारी बैलांची जोडी हिरव्या रानी चरत आहे. गोप शेतात गाणी गात फिरत आहेत. मंजुळ पावा श्रावणाचा महिमा एकासुरात गात आहे.

**प्र. ४.** १. श्रावणात जिथे पहावे तिथे हिरवळ पसरलेली वाटते. क्षणात पाऊस व क्षणात ऊन यांचा लपंडाव चालू असतो. इंद्रधनुष्य असे पसरते की नभात तोरण बांधल्यासारखे वाटते. सूर्यास्तावेळी किरणे उंच घरावर पिवळे रंग उधळतात. पाखरे पंख फडफडवतात. हरिणी बाळांसह बागडते. बैलांची जोडी रानात चरते. विविध सुगंधी फुले वेलीवर हेलकावे घेत आहेत. परडी घेऊन मुली फुले-पाने खुडतात. पाण्यांवर सुंदर तरंग उठत आहे.

२. चंपा सोन्याप्रमाणे फुलला आहे. केवड्याचा सुगंध दरवळत आहे. पारिजात फुलला आहे. त्यांच्याकडे पाहून मनातील राग मावळत आहे. अशी ही गोड फुले तोडायला मुली सुंदर परडी घेऊन आल्या आहेत. सुंदर हार व माळा त्यांनी बनवल्या आहेत.

**प्र. ५.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर ५. बरोबर ६. चूक

## ७. एका कामात चार कामे

**प्र. १.** १. लोकांच्या मुली एका कामात चार कामे करून मोकळ्या होतात असे आई म्हणते. २. इंदिराकाकूंची शारदा चिंगीपेक्षा वर्षाने लहान आहे.

३. आई चिंगीला नळावरून तांबे भरून आणायला सांगते. ४. चिंगी नळावर जाईपर्यंत नळाचे पाणी गेले होते.

५. 'एका कामात चार कामे' या पाठात रविवार सुट्टीचा दिवस सांगितला आहे.

६. चिंगीने पोहे-गूळ, दाणे, तिखटमीठ व खोबरे इ. पदार्थ आईकडून मागून घ्यायचे ठरविले.

**प्र. २.** १. चार २. रिकामे ३. नळाचे ४. काठी ५. कोपऱ्यावर

६. तारीफ ७. कनवाळूपणाचे, कौतुक

**प्र. ३.** १. आई चिंगीला म्हणाली. २. चिंगी आईला म्हणाली. ३. केसूकाका चिंगीला म्हणाले.

**प्र. ४.** १. चूक २. बरोबर

## ८. तेनालीरामचे चातुर्य

**प्र. १.** १. प्रजावत्सल राजा म्हणून कृष्णदेवराय याची ख्याती होती. २. मंत्र्याचा पुतण्या आळशी आणि कामचोर होता.

३. विहिरींची चौकशी करण्यास राजा, महामंत्री व तेनालीराम गेले. ४. तेनालीरामने शेतकऱ्याच्या मदतीने डाव रचला.

५. एकदा का खुर्चीवर बसलो की मलासुद्धा खुर्चीची बाधा होईल. असे तेनालीराम म्हणाला.

६. राजाने मंत्र्यासमोर नवीन विहिरी खोदण्याची योजना मांडली. ७. तू मंत्रीमंडळात ये. असे राजाने तेनालीला सुचवले.

**प्र. २.** १. राज्यात २. खुर्चीवर ३. पाणी ४. हजार ५. शिपाई ६. मंत्री ७. शेतकरी

**प्र. ३.** १. जर राज्यात दोन-दोन मैलावर विहिरी खोदल्या तर प्रजेचे दु:ख कमी होईल असे राजाला वाटले.

२. तेनालीरामने शेतकऱ्याच्या मदतीने हा डाव रचला. महामंत्र्याचा खोटेपणा उघड करण्यासाठी व त्याने केलेले घोटाळे पुढे आणण्यासाठी तेनालीरामने शेतकऱ्याची मदत घेतली.

प्र. ४. १. महामंत्री महाराजांना म्हणाले. २. तेनालीराम महाराजांना म्हणाला. ३. तेनालीराम महाराजांना म्हणाला.

## ९. बदलते विचार

**प्र. १.** १. राजाने कुशल कारागिरांना राज्यात बोलावले. २. राजा वृद्ध शिल्पकाराला 'शिल्पकार श्रेष्ठ' म्हणून बोलवत असे.

३. राजाने वृद्ध शिल्पकाराला खास इमारत जी त्या शिल्पकाराने बनवली होती. ती इमारत पुरस्कार म्हणून दिली.

४. शिल्पकाराला सेवानिवृत्त होण्याचा पूर्ण अधिकार आहे, असे राजा म्हणतो. ५. राजाला उत्कृष्टतेची आणि श्रेष्ठतेची अपेक्षा होती.

६. राजाच्या राज्यात चारही बाजूला मोठ्या इमारती होत्या. ७. राजा वृद्ध शिल्पकाराचा विशेष सत्कार करू इच्छितो.

**प्र. २.** १. शिल्पकाराला २. पुरस्कार ३. आयुष्यभर

**प्र. ३.** १. राजा वृद्ध शिल्पकाराला म्हणाला. २. वृद्ध शिल्पकार राजाला म्हणाला. ३. राजा वृद्ध शिल्पकाराला म्हणाला.

**प्र. ४.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. चूक

**प्र. ५.** १. राजाने शिल्पकारांना राज्यात बोलावले; जेणेकरून सुंदर इमारतींची निर्मिती करणं शक्य होईल.

२. कामाबद्दलची चीड किंवा अनुत्साह यामुळे आपण आपला पुरस्कार गमावू शकतो.

३. शिल्पकाराला जाणवले की आपण हे काम मन लावून केले नाही व या इमारतीत अनेक दोष आहेत.

## १०. आई

**प्र. १.** १. ‘स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी’ असे कवी म्हणतो.

२. ‘आई’ या कवितेत ‘चिमणी’ या पक्षीचा व ‘गाय’ या प्राण्याचा उल्लेख केला आहे.

३. चिमणी आपल्या पिल्लांना चारा देते.

४. कवी रोज प्राणी व पक्ष्यांचे वात्सल्य पाहतो.

५. आई रागाने बोलल्यावर कवी रुसणार नाही.

६. मातेच्या पायात कवीचा जीव गुंतला आहे.

७. कवी कर्तव्य करण्यास मातेला बोलावत आहे.

८. कवी माऊलीचे प्रेम कधीही मिळणार नाही याला आपले दुर्भाग्य मानतो.

**प्र. २.** कवितेच्या ओळी विद्यार्थ्यांनी पुस्तकाद्वारे लिहाव्यात.

**प्र. ३.** १. कवी आईला जरी तू रागावली तरीही न रुसण्याचे वचन देऊन रागवण्यास तरी ये अशी विनंती करतो.

२. चिमणी आपल्या पिल्लांना दाणा देते, गाय वासराला चाटते ही माया, प्रेम, वात्सल्य पाहून कवी हळवे होतात. या जगात माऊलीचे प्रेम कधीही मिळणार नाही या विचाराने कवी दु:खी होतो व यालाच कवी आपले दुर्भाग्य मानतो.

३. कवीला आई म्हणून हाक मारण्यास कुणीही नाही. आपल्याला आई नाही हे दु:ख कवीचे चित्त व्यथीत करते.

**प्र. ४.** १. चिमणी पिल्लांना चोचीत दाणा भरवते व वासराला गोठ्यात गाय चाटते.

२. आपल्याला आई नाही हे दु:ख कवीचे चित्त व्यथीत करते. मग तिन्ही जगाचा राजा असुनही जर आई नसेल तर तो राजा भिकारी मानावा.

३. जरी माता रागावली तरीही न रुसण्याचे वचन देऊन रागवण्यासाठी तरी ये अशी विनंती कवी करतो.

## ११. बंधुप्रेम

**प्र. १.** १. कौरव शंभर होते.

२. हस्तिनापूरचे सगळे राज्य कौरवांना हवे होते.

३. पांडवांच्या थोरल्या भावाचे नाव धर्मराज होते.

४. दुर्योधन स्वभावाने तापट व कपटी होता.

५. पांडव पाच होते.

६. कौरवांच्या थोरल्या भावाचे नाव दुर्योधन होते.

७. धर्मराज स्वभावाने नम्र व शांत होता.

**प्र. २.** १. चुलत २. दुर्योधन ३. तापट, कपटी

**प्र. ३.** १. चूक २. बरोबर ३. चूक

**प्र. ४.** १. ऋषी पांडवांना म्हणाले. २. चित्ररथ गंधर्वांना म्हणाला. ३. धर्मराजा भीमला म्हणाले.

**प्र. ५.** १. कौरव व गंधर्वामध्ये झालेल्या भांडणात कौरवांचा पराभव झाला. गंधर्वांने कौरवांच्या सैन्यांना पळवून लावले; पण चित्ररथाने दुर्योधनाला पकडून आपल्या रथाला बांधून ठेवले. धर्मराजांना हे कळताच त्यांनी चित्ररथाचा पाठलाग केला. चित्ररथाशी लढाई केली व दुर्योधनाची सुटका केली. दुर्योध नाला धर्मराजाकडे आणताच त्याचे तोंड पार उतरले. त्याने लाजेने मान खाली घातली. धर्मराजाचे बंधुप्रेम व उदार मन पाहून दुर्योधनाला लाज वाटली.

२. तळ्यात सुंदर कमळे फुलली होती. हंस, बदके यांच्यासारखे पक्षी तळ्यात पोहत होते. तळ्याच्या काठावर सुंदर फुलझाडे व मोठे मोठे वृक्ष होते हे सारे पाहून गंधर्वांना तळ्याजवळील जागा पसंत पडली.

३. कौरव व पांडव खेळत असताना जो हरेल त्याने आपल्या भावांबरोबर बारा वर्षे वनवासात व एक वर्षे अज्ञातवासात राहावे. अज्ञातवास म्हणजे कुणीही न ओळखता दिवस घालवणे. जर कुणी ओळखले तर पुन्हा बारा वर्ष वनवास व एक वर्ष अज्ञातवास ही शिक्षा ठरली.

## १२. चतुर बिरबल

**प्र. १.** १. अकबर बादशहा सिंहासनावर बसला होता.

२. एक भिल्ल पिंजरा घेऊन आला.

३. भिल्लाला पोपट रानात मिळाला होता.

४. बादशहाने बक्षीस म्हणून एक हजार सोन्याच्या मोहरा दिल्या.

५. राजाचा मित्र बिरबल होता.

६. समाधी लावून पोपट बसला होता.

७. भिल्लाने बिरबलच्या चातुर्याचे कौतुक केले.

**प्र. २.** १. समाधी २. बादशहाला ३. मिटले

**प्र. ३.** १. चूक २. बरोबर ३. बरोबर

**प्र. ४.** १. अकबराने बिरबलाकडे बोट दाखवून विचारले, "पोपटा, हा कोण आहे? सांग पाहू." पोपटाने बरोबर उत्तर दिले. त्याचे उत्तर ऐकून सारे आश्चर्य. चकित झाले. अशा रितीने अकबरने पोपटाची परीक्षा घेतली.

२. बादशहाने नोकराला असा हुकूम दिला की पोपटाची नीट काळजी घे. ह्याला काहीही झाले तर तुला कडक शिक्षा करेन आणि त्याच्या मरणाची बातमी जर तू मला दिलीस तर मी तुझे डोके उडवीन.

३. भिल्ल बिरबलाचे पाय धरून असे म्हणाला की बिरबल महाराज, आता आपणच माझे प्राण वाचवा.

**प्र. ५.** १. अकबर बादशहा बिरबलला म्हणाला. २. भिल्ल अकबर बादशहाला म्हणाला. ३. नोकर बिरबलला म्हणाला.

## १३. बिनभिंतीची शाळा

**प्र. १.** १. शाळा बिनभिंतीची आहे. २. भुंग्यांचा सूर ऐकू येणार आहे. ३. झाडावरून मोहळ काढणार आहे.

४. चिडत्या, डसत्या मधमाश्यांचा सामना करणार आहे. ५. संध्याकाळी चांदण्या मोजणार आहेत. ६. सकाळी उन्हात न्हाऊ असे कवीला वाटते.

७. मुंग्याचा बंगला पाहणार आहे. ८. कवी ओढ्यांच्या काठी हिंडणार आहे. ९. दुपारी पञ्हयात पोहणार आहे.

**प्र. २.** या प्रश्नाचे उत्तर विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातून लिहावे.

**प्र. ३.** १. चूक २. बरोबर ३. चूक ४. बरोबर

**प्र. ४.** १. कवी म्हणतो की या बिनभिंतीच्या शाळेत आपण मुंग्याचा बंगला पाहण्यास जाऊ, तसेच भुंग्यांचे मधुर गाणे देखील ऐकू.

२. या बिनभिंतीच्या शाळेत फुलपाखरू प्रत्येक फुलांचे वेगवेगळे रंग दाखवत फिरते ते पाहू.

३. झाडे, वेली, पाने, पक्षी, पाखरे यांच्याशी भरपूर गोष्टी करू.

४. या बिनभिंतीच्या शाळेत अनेक मधमाशा आहेत व त्या चावत आहेत. त्यांचा सामना करण्यास आपण सज्ज होऊया.

५. सकाळी लवकर उठून कोवळ्या उन्हाची किरणे आपल्या अंगावर घेऊया व दुपारी तलावात, पञ्हयात पोहूया.

## १४. क्रांतिकारक- चंद्रशेखर आझाद

**प्र. १.** १. एका इंग्रज शिपायाने मुलाच्या हातात बेड्या घातल्या. २. मुलाचे नाव चंद्रशेखर आझाद होते. ३. हुकमाचे पालन तुरुंग अधिकारी यांनी केले.

४. मुलाला वेताचे बारा फटके मारण्यात आले. ५. 'चंद्रशेखर आझाद' हे क्रांतिकारकांचे नेते बनले.

६. क्रांतिकारी दलातील लोक आझादांना 'आझाद भैया' किंवा 'पंडितजी' म्हणत असत. ७. आझाद आल्फ्रेड पार्कमध्ये बसले होते.

**प्र. २.** १. धडकी २. थेंबही ३. मरणाला ४. थोबाडीत ५. न्यायाधीश

**प्र. ३.** १. चूक २. बरोबर ३. बरोबर

**प्र. ४.** १. न्यायाधीश आझाद यांना म्हणाले. २. आझाद पोलिसांना म्हणाले. ३. लोक आझादांना म्हणाले.

**प्र. ५.** १. ज्याचा अपराध खूप मोठा असतो जो तुरुंगाचे नियम तोडतो त्यालाच वेत मारण्याची शिक्षा दिली जात असे.

२. इंग्रज न्यायाधीशाने मुलाला तुरुंगवासाची शिक्षा दिली व त्याला वेताचे बारा फटके मारण्याची ही शिक्षा दिली.

## १५. गुढीपाडवा

**प्र. १.** १. वसंतऋतूचे आगमन आणि नव्या वर्षाचा प्रारंभ म्हणून 'चैत्र पाडवा' साजरा होतो. २. गुढीपाडव्यापासून नवीन वर्षाची सुरुवात होते.

३. ब्रम्हदेवाने हे जग चैत्र शुद्ध प्रतिपदेला निर्माण केले. ४. वानर प्रजेला वालीपासून प्रभू श्रीरामचंद्रांनी मुक्ती दिली.

५. पूर्वीच्या काळी चैत्र महिन्याला 'मधुमास' म्हणत. ६. गुढीपाडवा हा सण आंध्र प्रदेश व कर्नाटक येथे 'उगाडी' या नावाने साजरा केला जातो.

**प्र. २.** १. गुढीपाडवा २. पाडव्या ३. अभिष्टचिंतन ४. वसंतऋतूचे ५. गुढीपाडव्या ६. श्रीराम ७. वर्षप्रतिपदा

**प्र. ३.** १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. चूक

**प्र. ४.** १. कडुलिंबाची पाने अंघोळीच्या पाण्यात टाकतात; कारण उन्हाळ्यात होणाऱ्या त्वचारोगांपासून बचाव करण्याचे सामर्थ्य यात आहे.

२. गुढी पाडव्याच्या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ इत्यादी गोष्टी केल्या जातात.